प्रकरण १ ले

परिशिष्ट १ ले

रंगभूमी नियतकालिकाचे संपादक
श्री. शंकर बापूजी मुजुमदार यांच्यासंबंधीची माहिती

श्री. शंकरराव मुजुमदार यांचा जन्म इ.स. १८६२ मध्ये झाला. १८६९ पासून ते सांगलीकर नाटक मंडळीच्या पौराणिक नाटकातून भूमिका करीत असत. या नाटकात सुरुवातीला श्रीगणेश व सरस्वती यांचा प्रवेश असे. त्यात शंकरराव सरस्वतीची भूमिका करीत. या नाटक कंपनीत ते ७-८ वर्षे होते. या काळात ते विश्रामबाग वाड्यातील विश्रामबाग हायस्कूलमध्ये शिकत होते. श्री. मुजुमदार हे अतिशय सुस्वरूप असल्यामुळे सांगलीकर नाटक मंडळीमधील 'देवपुड्या त असत. मुजुमदारांचे नाटक मंडळीत जाणे त्यांच्या घरच्या माणसांना मुळीच आवडलेले नव्हते. लोकमान्य टिळकांचे स्नेही श्री. नामजोशी यांनीही त्यांना प्रथम नाटक मंडळीत न जाण्याचा सल्ला दिला होता पण पुढे मात्र त्यांनी प्रोत्साहन आणि आशीर्वाद दिला. नाटकधंद्यातील च.अ. म्हणजे पारंगत झाले पाहिजे असे त्यांना सांगितले.

इ.स. १८८० मध्ये श्री. मुजुमदार हे पुणे येथील न्यू इंग्लिशस्कूल मध्ये सहावीत विद्यार्थी होते. ते पदवीधर होऊ शकले नाहीत पण श्री. माधवराव नामजोशी हे ''डेक्कन स्टार' या नावाचे वर्तमानपत्र काढीत असत. त्यांच्या प्रोत्साहनाने शंकररावांना लिहिण्याची आवड निर्माण झाली. इंग्रजी हा त्यांचा आवडता विषय होता. इंग्रजी कादंबऱ्या वाचनाची त्यांना आवड उत्पन्न झाली होती. पुढे रेनॉल्डच्या Mysteries of London चे 'लंदन रहस्य या नावाने व Mysteries of Court of London या पुस्तकाचे 'बड्या लोकांची गुप्त कृत्ये या नावाने त्यांनी भाषांतर केले. गॅरिकचे चरित्र, महाराष्ट्रीय रंगभूमीचा इतिहास, नाटक कसे पहावे ही पुस्तके त्यांनी लिहिली. पुढे रंगभूमी नियतकालिकात त्यांनी विपुल लेखन केले.

श्री. मुजुमदार यांची बेळगावला श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याशी ओळख झाली. १८८० मध्ये ते किर्लोस्कर नाटक मंडळीत गेले. त्यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीत यावे म्हणून स्वत: आण्णासाहेब किर्लोस्करांनी श्री. मुजुमदार यांच्याशी पत्रव्यवहार करून प्रयत्न केला. किर्लोस्कर नाटक मंडळीत, अत्यंत देखणे रूप असलेल्या शंकररावांना ' शाकुन्तल मधील शकुन्तलेची भूमिका मिळाली. त्यांना गाता येत नसल्यामुळे प्रथम शकुन्तलेला पदे नव्हती. श्री. शंकरराव मुजुमदार हे ' सौभद्रा त रूक्मिणीची व ' रामराज्यवियोगा त कैकयीची भूमिका करीत. पुढे काही दिवस ते किर्लोस्कर नाटक मंडळीत नव्हते परंतु १८८५ मध्ये श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर मृत्यू पावल्यावर ते पुन: कंपनीत आले. कंपनीचे मालक झाले. १८९३ मध्ये ते किर्लोस्कर नाटक कंपनीचे सेक्रेटरी झाले. आण्णासाहेब किर्लोस्कर दिवंगत झाले, कंपनीचे मॅनेजर श्री.त्र्यंबकराव साठे कंपनी सोडून गेले म्हणून त्यावेळी कंपनीचा कारभार पाहात असलेल्या भाऊराव कोल्हटकरांनी '' किर्लोस्कर कंपनीस मॅनेजरचे काम करणारा हुशार मनुष्य पाहिजे ' अशी 'केसरी त जाहिरात दिली. (या संदर्भातील शंकरराव मुजुमदार व किर्लोस्कर संगीत मंडळीचे मालक यांच्यातील पत्रव्यवहार विश्रब्ध शारदा खंड २ रा प्रथमावृत्ती १९७५ - ह. वि. मोटे प्रकाशन या ग्रंथात उपलब्ध आहे. किर्लोस्कर नाटक मंडळीशी संबंधित इतरही अनेक महत्त्वाची पत्रे या ग्रंथात आहेत.) त्यानंतर श्री. शंकरराव मुजुमदार यांची किर्लोस्कर नाटक मंडळीचे सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली. कंपनीची मालकी आणि दर नाटकात मुख्य पुरुष भूमिका अशा दोन्ही जबाबदाऱ्या त्यांच्यावर आल्या. १९०५ साली त्यांनी श्री. आण्णासाहेब किर्लोस्कर यांचे चरित्र लिहिले. १९०७ साली रंगभूमी नावाचे, नाटक याच एकाच विषयाला वाहिलेले नियतकालिक सुरु केले. त्यात त्यांनी विपुल लेखन केले. अनेक नट व नाटककार यांची चरित्रे त्यांनी या नियतकालिकात लिहिली हे त्यांचे कार्य मौलिक आहे. पाश्चात्य रंगभूमीबाबत त्यांनी स्फुट लेखन केले. बाराव्या नाट्यसंमेलनाचे ते अध्यक्ष झाले.

श्री. शंकरराव मुजुमदार यांना किर्लोस्कर नाटकगृहाची कल्पना १९०६ साली सुचली, पण ते बांधण्यासाठी करावा लागणारा खर्च किर्लोस्कर नाटक मंडळीला झेपण्यासारखा नव्हता म्हणून पुण्यातील प्रख्यात सराफ मार्तंडराव टापरे यांच्या भागीदारीत नाटकगृह बांधावे अशी योजना निश्चित होऊन पायाभरणीचा समारंभ १९०८ साली करण्यात आला. किर्लोस्कर नाटक मंडळी आणि मार्तंडराव टापरे यांच्यातील करारपत्र श्री. न. चिं. केळकर यांनी तयार केले होते. किर्लोस्कर नाटक गृहाचे उद्घाटन मुंबई सरकारचे गृहमंत्री सर मॅकेन्झी मूर

यांच्या हस्ते २१ ऑगस्ट १९०९ रोजी झाले आणि त्यानंतर किर्लोस्कर नाटक मंडळीने शाकुंतलच्या पहिल्या चार अंकाचा प्रयोग करून दाखविला.

किर्लोस्कर नाटक मंडळीचे सेक्रेटरी, किर्लोस्कर नाटक गृहाचे निर्माते, किर्लोस्कर चरित्राचे लेखक, रंगभूमी नियतकालिकाचे संपादक, ही श्री. शंकरराव मुजुमदार यांची कामगिरी खूपच महत्त्वाची आहे. किर्लोस्कर नाटक मंडळीचे एक नाट्यग्रंथ संग्रहालयही त्यांनी निर्माण केले. छोटासा छापखानाही काढला.

किर्लोस्कर नाटक मंडळीचे सेक्रेटरी या नात्याने त्यांनी बजावलेली कामगिरी आणि त्यांचे एकूण नाट्यविषयक कर्तृत्व खूप मोठे आहे. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या मालकांना त्यांच्याबद्दल आदर होता त्यामुळे नट मंडळींवर त्यांचा वचक होता. कंपनीचे हिशेब त्यांनी अत्यंत चोख ठेवले होते त्यात ते लांड्यालबाड्या करीत नसत. ते अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक, महत्त्वाकांक्षी, व कल्पक गृहस्थ होते. लेखनाची अमर्याद हौस असलेले ते मराठी रंगभूमीवरील पहिले नट असावेत. नटांच्या शिक्षणाचा विचार करणारे ते दूरदृष्टीचे सेक्रेटरी होते. नाटककंपनीतील मुलांना गणित, जमाखर्च, वाचन, इतिहास, भूगोल इ. विषय शिकविण्यासाठी भागवत, आठवले, राम गणेश गडकरी हे मास्तर ठेवले होते. भाऊराव कोल्हटकर आजारी पडल्यावर मोठ्या युक्तीने नानासाहेब जोगळेकरांना मुजुमदारांनी कंपनीत आणले. १९०० मध्ये भाऊराव वारले. मुजुमदारांच्याच खटपटीने १९०५ मध्ये मिरजेच्या मुक्कामात बालगंधर्व किर्लोस्कर नाटक मंडळीला मिळाले.

श्री. मुजुमदार किर्लोस्कर नाटक मंडळीचे सेक्रेटरी असतानाच्या काळात अनेक अडचणी आणि अवघड प्रसंग आले. त्या सगळ्यातून त्यांनी कंपनी सावरून धरली. अडचणीतून मार्ग काढला. १५ नोव्हें. १९११ मध्ये नानासाहेब जोगळेकरांचा मृत्यू झाला. 'सुमती नाटकाच्या वेळी कृष्णराव गोरे कंपनी सोडून गेले, नाशिकला ' शारदा नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी रँड साहेबाचा खून झाला, बालगंधर्व कंपनीतून बेपत्ता झाले. १९१३ मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीतून फुटून बालगंधर्व, गणपतराव बोडस, टेंबे यांनी गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली. १९१८ मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीत दुसऱ्यांदा फाटाफूट होऊन बलवंत नाटक मंडळी निघाली. चिंतामणराव कोल्हटकर, मास्टर दीनानाथ, कृष्णराव कोल्हापुरे यांनी बलवंत नाटक मंडळीची स्थापना केली. गंधर्व नाटक मंडळीच्या स्थापनेनंतरच्या काळात किर्लोस्कर नाटक मंडळीत चिंतामणराव कोल्हटकर व मास्टर

दीनानाथ हे प्रमुख नट होते. १९१३ मध्ये गंधर्व नाटक मंडळी स्थापन झाली. त्यावेळी राम गणेश गडकरी हे शंकरराव मुजुमदार यांच्या बाजूचे होते. पुढे त्यांचे पटेनासे होऊन ते कंपनी सोडून गेले. गंधर्व नाटक मंडळी निघाली त्याचवेळी ' मानापमान नाटकाचे किर्लोस्कर नाटक मंडळीकडे असलेले हक्क कृ. प्र. खाडिलकर यांनी काढून घेतले. किर्लोस्कर नाटक मंडळीतून बाहेर पडून आम्ही गंधर्व नाटक मंडळी स्थापन करीत आहोत अशी नोटीस बालगंधर्व, गणपतराव बोडस, गोविंदराव टेंबे यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीला १८ जुलै १९१३ ला दिली. त्याच दिवशी किर्लोस्कर नाटक मंडळीकडून ' मानापमान ची मोनॉपोली काढून घेतल्याची नोटीस कृ. प्र. खाडिलकरांनी दिली. ही सारी संकटे फार मोठी होती. गंधर्व नाटक मंडळीच्या स्थापनेनंतर किर्लोस्कर नाटक मंडळीला हिंदी नाटकाचा आधार घेण्याची गरज भासली. शंकरराव मुजुमदार व चिंतामणराव कोल्हटकर यांनी अप्पासाहेब पीलखाने व रघुनाथराव दर्द या दोघांनी लिहिलेले ' ताजेवफाँ आणि ईस्माईल यांनी लिहिलेले ' काँटोमे फूल ही नाटके बसविली. या दोन नाटकांनी किर्लोस्कर नाटक मंडळीने मुंबई, उत्तर हिंदुस्थान आणि कलकत्ता गाजविले. त्यावेळी ' अमृतबझार पत्रिके सारख्या कलकत्त्याच्या मातब्बर वृत्तपत्रात या नाटकांबद्दल प्रशंसापर लेख प्रसिद्ध झाले.

अशा रीतीने श्री. शंकरराव मुजुमदार यांनी आपल्या कर्तृत्वाने किर्लोस्कर नाटक मंडळीचा लौकिक वाढवला आणि नाट्यक्षेत्रातील आपले सर्वांगीण कर्तृत्व सिद्ध केले. श्री.. शंकरराव मुजुमदार हे २८ नोव्हे. १९३८ रोजी मृत्यू पावले.

श्री. शंकरराव मुजुमदार यांच्या चरित्रात्मक माहितीचे संदर्भ -

१. मराठी नियतकालिकांची सूची, तृतीय खंड - दाते । काळे । बर्वे
२. अर्वाचीन चरित्रकोश - सिद्धेश्वर शास्त्री चित्राव, पृ. ५०२
३. विश्रब्ध शारदा खंड २, प्रथमावृत्ती १९७५ - ह. वि. मोटे प्रकाशन
४. स्वराज्य - २२ एप्रिल, २० मे, २७ मे, ३ जून १९६७ चे अंक यातील ' नाटक कंपनीला शिस्त लावणारे शंकरराव मुजुमदार हे श्री. य. ना. आठवले यांचे लेख.

५. चित्रमयजगत् – वर्ष ३० वे जाने. १९३९ पृ. ५५, प्रो. डॉ. न. का. घारपुरे यांनी मुजुमदारांवर लिहिलेला मृत्युलेख.
६. माझा नाटकी संसार – भा. वि. वरेरकर
७. महाराष्ट्रचे दुसरे वेड – पु. रा. लेले.